# गणपती बाप्पा मोरया...!

मानसी काणे



परी प्रकाशन



**गणपती बाप्पा मोरया...!**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.


**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये ८०/-











# अनुक्रमणिका


१. गणेश जन्म ..................... ५
२. चुकीची जाणीव ................ ९
३. गणेशाचं वाहन उंदीर ........... १०
४. गणेश विवाह .................. १२
५. चंद्राला शाप .................. १४
६. तालासुराची कथा .............. १५
७. सिंदुरासुराचा वध ............ १८
८. आत्मलिंगाची कथा ............ २४
९. दुरासदाचा वध ................ २६
१०. महोत्कट अवतार .............. २८
११. महोत्कटाचे उपनयन ........... ३३
१२. नरांतक वध .................. ३४
१३. देवांतकाचा वध ............... ४०
१४. वक्रतुंड रूपात गणेश ............ ४३
१५. मयुरेश्वर अवतार ............... ४६
१६. मातेचे रक्षण .................... ५२
१७. देवांचं गर्वहरण ................ ५३
१८. कुबेराचं गर्वहरण ............... ५६
१९. गणेश आणि महाभारत ......... ५८
२०. लक्ष्मी– गणपती ............... ५९
२१. भैरवाला दिले दिव्य रूप ........ ६०
२२. यज्ञाचं रक्षण .................... ६३
२३. एकदंत स्वरूप ................. ६५
२४. इलवलाचा अंत ................ ६८
२५. त्रिपुरासुराचा वध ............... ७०
२६. परशुरामाचे गर्वहरण............ ७६
२७. दुर्वा माहात्म्य .................. ७७
२८. शमी माहात्म्य ................. ८२
२९. मंदार आणि शमी यांचा उद्धार ... ८४
३०. बाल गणेशाकडून राक्षसांचा संहार ८५
३१. ब्रह्मदेवाचा यज्ञ आणि... ....... ९०
३२. दिवोदासाची कथा ............. ९२
३३. काशीराजास गणेश लोकाची प्राप्ती ९४
३४. कद्रू व विनता यांचे भांडण ........ ९६
३५. कमलासुराचा वध .............. ९९
३६. विष्णू व गणेश यांचे अभेदत्व .... १००
३७. शिवगणांचे गर्वहरण ............ १०१
३८. इंद्राचे गर्वहरण ................ १०२
३९. गणेशाचा धूम्रवर्णावतार ......... १०४



# गणेशजन्म

भगवान शंकर आणि पार्वती कैलास पर्वतावर राहत होते. शंकराच्या सेवेसाठी शिवगण सज्ज होते. त्याच्या प्रत्येक आज्ञेचे पालन ते मोठ्या कसोशीनं करीत; पण पार्वतीमातेच्या आदेशाचं पालन करण्यात मात्र ते टाळाटाळ करीत असत. सगळे शिवगण कैलासावर अगदी स्वच्छंदतेनं कोठेही फिरत असत. त्यामुळे पार्वतीला एकांत कसला तो मिळत नसे. शिवगणांच्या वागण्याला ती अगदी कंटाळून गेली होती. एक दिवस काय झालं, पार्वती गेली होती आंघोळीला. इतक्यात शंकर आले आणि आत जाऊ लागले. दरवाजावर नंदी पहारा देत होता. शंकरांना पाहून तो विचारात पडला की, 'आता यांना आत जाऊ द्यावं की नाही ? आणि अडवू तरी कसा? काही झालं तरी मी त्यांचा सेवक आहे; पण मग देवी पार्वतीच्या आज्ञेचं काय?' नंदी विचार करीत होता. इतक्यात शंकर त्याला बाजूला सारून आत गेले. त्यांना आलेलं पाहून पार्वती लाजली. शंकरांच्या अचानक आत येण्यामुळं तिचा एकांत भंग झाला. तिला राग आला. तिनं मनाशी निश्चय केला की, ती आता स्वतंत्रपणानं आपलेही गण तयार करेल. ते तिचं सगळं ऐकतील आणि कधीच तिच्या आज्ञेचं उल्लंघन करणार नाहीत.



दुसऱ्या दिवशी पार्वतीनं आपल्या

अंगाला भरपूर उटणं लावलं. मग ते अंगावरून चोळून चोळून काढलं आणि त्यापासून एक सुंदर बालकाची मूर्ती तयार केली. तिला छान छान वस्त्राभूषणांनी सजवलं. मग आपल्या शक्तीच्या सहाय्यानं त्याला सजीव केलं. ते सुंदर आणि गोंडस बालक पाहून तिला फार आनंद झाला.

त्याच्या हातात एक काठी देऊन ती म्हणाली, ''बाळा, हा घे दंड. हा तुझं रक्षण करेल. आजपासून तू माझ्या आज्ञेचं पालन करायचंस. त्यासाठीच मी तुझी निर्मिती केली आहे.

दंड हातात घेऊन बालक म्हणाला, ''आई, मी तसंच करेन.''

पार्वती म्हणाली, '' मी आंघोळीला चालले आहे. तू दरवाज्यात पहारा देत उभा राहा. कोणालाही आत येऊ देऊ नकोस.'' पार्वती आंघोळीला गेली. इतक्यात शंकर आले आणि आत जाऊ लागले.

बालकानं त्यांना थांबवलं. म्हणाला, ''आत माझी माता स्नान करीत आहे. तिची आज्ञा आहे की, कोणालाही आत सोडायचं नाही. त्यामुळं तिचं स्नान होईपर्यंत आपण आत जाऊ शकणार नाही.''

''मी कोण आहे ते माहीत आहे का तुला ? मी आहे भगवान शंकर. पार्वतीचा पती. मुकाट्यानं मला आत जाऊ दे.'' शंकर म्हणाले.

''नाही, मी तुम्हाला आत जाऊ देणार नाही.'' बालकानं निक्षून सांगितलं.

शंकराला फार राग आला. ''तुझं हे धाडस ? माझ्याच घरात जायला मला बंदी करतोस ? पाहतो कसा जाऊ देत नाहीस ते.''असं म्हणत शंकराने जबरदस्तीनं आत जाण्याचा प्रयत्न केला. बालकानं त्यांच्यावर दंडानं जोरदार प्रहार केला. शंकरांनी थोडंसं मागं येऊन बचावाचा पवित्रा घेतला. त्यांचा क्रोधाग्नी भडकला.

आपल्या गणांना आज्ञा देत ते म्हणाले, ''बाजूला करा या मुलाला माझ्या मार्गातून. यानं माझा रस्ता अडवला आहे. हाकलून द्या त्याला.'' धन्याची आज्ञा शिरसावंद्य मानून नंदी आणि बाकीचा गणसमुदाय बालकावर धावून गेला; पण त्यानं दंडाच्या प्रहारानं झोडपून सर्वांना पिटाळून लावलं. कसाबसा आपला जीव वाचवून ते शंकराकडे गेले.

शंकर विचार करू लागले, 'या दुष्ट बालकानं माझ्या गणांना पळवून लावलं काय ? आता मलाच काहीतरी केलं पाहिजे.' शंकरांनी आपलं त्रिशूळ बालकावर सोडलं; पण पार्वतीमातेनं दिलेल्या शक्तीच्या सहाय्यानं त्यानं ते रोखलं. शंकरांना समजून चुकलं की, या मुलावर सहजासहजी विजय मिळविता येणार नाही. त्यांनी आपल्या मदतीसाठी ब्रह्मा, विष्णू, इंद्र आणि इतर देवांना बोलावलं. सगळे देव आणि हा छोटा बालक यांच्यात घनघोर युद्ध झालं. देवांकडून सोडलेल्या अस्त्रांचा काहीच परिणाम होईना. ही परिस्थिती पाहून शंकरांनी त्याला कपटानं पराजित करण्याचं ठरवलं. त्यांनी विष्णूंच्या कानात काहीतरी सांगितलं.

विष्णूंनी समोर जाऊन बालकाला युद्धासाठी ललकारलं. बालकानं आपल्या हातातील दंड सर्व शक्तीनिशी विष्णूवर फेकला; पण गरुडानं मध्ये येऊन आपल्या चोचीत तो पकडला. विष्णू वाचले, आणि युद्ध करत बालकाला उत्तरेकडं घेऊन गेले. संधी मिळताच शंकरांनी बालकावर पाठीमागून त्रिशूळाने वार केला आणि त्याचं मस्तक धडावेगळं केलं. देव–देवता आनंदानं भगवान शंकरांचा जयजयकार करू लागले.


आवाज ऐकून बाहेर येत पार्वतीनं विचारलं, ''बाळा, कसला दंगा चालला आहे रे ? कोण आलं आहे ?'' बाहेर येऊन तिनं पाहिलं तर काय बालक मरून पडलेला. ती जोरजोरात रडू लागली. तिच्या दु:खाचं रूपांतर भयानक क्रोधात झालं. तिनं उग्र रूप धारण केलं आणि हजारो शक्तिशाली तपस्विनी निर्माण केल्या.

त्यांना आज्ञा केली, ''जा, साऱ्या विश्वात प्रलय माजवा.'' पार्वतीचं उग्र रूप पाहून देव घाबरले. त्यांना वाटलं आता सर्व सृष्टीचा विनाश होणार.

ते पार्वतीकडं गेले आणि त्यांनी तिची प्रार्थना केली, ''माते शांत हो. आमच्यावर कृपा कर.''

पार्वती म्हणाली, ''भगवान शंकरांनी जर माझ्या मुलाला पुन्हा जिवंत केलं, तुम्ही याला पूजनीय मानलं, आणि त्याला सर्वध्यक्षाचं पद दिलं तर मी या शक्तींना परत बोलावेन.'' देव शंकरांकडे आले आणि पार्वतीचं म्हणणं त्यांना सांगितलं.

शंकरांनी म्हटलं ठीक आहे. जेणेकरून तिन्ही लोकात सुख नांदेल असंच व्हावं. त्यांनी आपल्या गणांना आज्ञा केली, ''उत्तरेकडं जा आणि जो कोणी सजीव प्रथम दृष्टीस पडेल त्याचं मस्तक कापून आणा. लवकरात लवकर.'' शिवगण उत्तरेकडं गेले. सर्वप्रथम त्यांना एक दात असलेला हत्ती दिसला. त्यांनी त्याचं शिर धडावेगळं केलं आणि कैलासावर येऊन शंकरांना दिलं. भगवान शंकरांनी ते हत्तीचं मस्तक बालकाच्या धडाला





जोडलं आणि आपल्या शक्तीनं त्याला पुन्हा जिवंत केलं. त्याला आशीर्वाद दिला आणि त्याचं नाव ठेवलं 'गजानन'. हत्तीचं तोंड असलेला.

मग ते म्हणाले, ''हे गजानना, तू अतुलनीय पराक्रम केला आहेस. मी तुला माझ्या गणांचा प्रमुख म्हणून नियुक्त करतो. सर्व देवांच्या अगोदर तुझी पूजा होईल. तू विघ्नेश्वर होशील आणि सर्व धार्मिक कार्यात, समारंभात तुला प्रथम पूजेचा मान मिळेल.''

बालकाला पुन्हा जिवंत केल्याची बातमी ऐकून माता पार्वती धावत आली आणि तिने त्याला छातीशी घट्ट कवटाळले. प्रेमाने त्याला वरदान देत म्हणाली, ''पुत्रा, तू धन्य आहेस. आता सर्व देव तुझी अग्रपूजा करतील. माणसं तुझी शेंदुरानं पूजा करतील.'' मग पार्वतीने गणेशाला नाना प्रकारच्या वस्तू दिल्या व शंकराच्या मांडीवर बसविले.

शंकरांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवला. म्हणाले, ''तू माझा दुसरा पुत्र आहेस'' आणि त्याला अनेक वर दिले. सर्वत्र आनंदी आनंद झाला. या वेळेपासून कोणत्याही शुभ कार्याचा आरंभ गणेश पूजनानं होऊ लागला.

✦✦

# चुकीची जाणीव


दिवसेंदिवस गणेशाच्या खोड्या वाढू लागल्या. शिवगणांबरोबर तो दिवसभर दंगामस्ती करीत राही. सर्वांच्या खोड्या काढी; पण तरीही तो सर्वांचा फार लाडका होता. एक दिवस खेळता खेळता त्याला एक मांजरी दिसली. मग काय ! त्याच्या खोड्यांना ऊत आला. त्यानं मांजरीची शेपटी पिरगळायला सुरुवात केली. मांजरी कळवळली. हातपाय झाडू लागली. गणेशाच्या हातून सुटण्यासाठी धडपडू लागली; पण व्यर्थ. त्याची पकड मजबूत होती. खूप वेळ धडपडून अखेर तिनं कशीबशी आपली सुटका करून घेतली आणि ती दणकन जमिनीवर आपटली. तिच्या अंगभर जखमा झाल्या. ती तशीच पळून गेली.

आता गणेशाला थोडी रूखरूख वाटू लागली. त्याला वाटलं, ''अरे आपल्याला तर मांजरीबरोबर खेळायचं होतं. तिला जखमी करायचं नव्हतं. तिला फार लागलं. चुकलंच माझं.'' पश्चात्तापानं त्याचे डोळे भरून आले.

शिवगणांना घेऊन तो घरी परतला. खेळून आल्यामुळं त्याला फार भूक लागली होती. खाऊ मागण्यासाठी तो आईकडे गेला; पण पाहतो तो काय, पार्वतीमाता विव्हळत होती. तिचे सर्व अंग जखमांनी भरले होते आणि धुळीने माखले होते. तिच्या शरीरावर माराचे वळ उठले होते. आईची अवस्था पाहून त्याचं मन दु:खानं भरून आलं. तो विचार करू लागला, माता पार्वतीच्या अंगी तर अलौकिक शक्ती आहे. या ब्रह्मांडांत तिला स्पर्श करण्याची शक्ती कोणातही नाही. मग या जखमा तिला झाल्या तरी कशा ? अचानक त्याला आपण मांजरीला दिलेला त्रास आठवला आणि मातेच्या अंगावरच्या जखमांचं कारण उमगलं.

माता पार्वती दिव्य शक्तिमान आणि सर्वव्यापी आहे. ब्रह्मांडातील सजीव आणि निर्जीव सर्व वस्तूंमध्ये ती आहे. ती जशी माझ्यात आहे तशी त्या मांजरीतही असणार. म्हणूनच मी मांजरीला त्रास दिला त्याचा परिणाम मातेवर झाला आणि त्या जखमा तिच्याही अंगावर झाल्या. आपण फार मोठी चूक केल्याचं जाणवून तो रडू लागला. त्यानं आपली चूक मातेजवळ कबूल केली. तिची क्षमा मागितली. तिला वचन दिलं की मी आता कोणालाही त्रास देणार नाही. विनाकारण खोड्या काढणार नाही. सर्वांशी प्रेमानं वागेन. मुक्या गरीब प्राण्यांना छळणार नाही. पार्वतीनं त्याची समजूत घातली आणि त्याला खाऊ दिला.

✦✦



# गणेशाचं वाहन उंदीर

उंदीर गणेशाचं वाहन कसा बनला त्याची कहाणीसुद्धा मनोरंजक आहे. गंधर्वराजा क्रौंच एकदा इंद्रसभा संपल्यावर गडबडीने चालला होता. अजाणता त्याचा पाय वामदेव मुनींच्या पायावर पडला. वेदनेनं ते कळवळले. त्यांना वाटलं क्रौंचानं त्यांच्या पायावर जाणूनबुजून पाय दिला आहे.

आपला अपमान झाला असे वाटून ते फार रागावले व त्यांनी क्रौंचाला शाप दिला की, ''तू उंदीर होशील.''

शापामुळे भयभीत झालेल्या क्रौंचानं मुनींच्या पायावर लोटांगण घातलं. त्यांची क्षमा मागितली. म्हणाला, ''मुनीवर मी थोडा गडबडीत होतो. त्यामुळं चुकून तुमच्या पायावर पाय पडला. मी मुद्दाम हे केलेलं नाही. माझ्या अपराधाची क्षमा असावी. माझ्यावर कृपा करा.''

क्रौंचानं अशी क्षमायाचना केल्यावर मुनी म्हणाले, ''मी माझा शाप परत घेऊशकत नाही; पण मी तुला उ:शाप देतो की, उंदीर झाल्यावर तू भगवान गणेशाचं वाहन बनशील आणि गणेशाबरोबर तुझीही पूजा होईल.'' मुनींच्या शापप्रभावानं क्रौंच उंदीर बनला आणि पराशर ऋषींच्या आश्रमात जाऊन पडला. त्याचं शरीर एखाद्या हत्तीसारखं विशाल होतं. दात आणि नखे टोकदार होती. तो मोठमोठे दगडसुद्धा कुरतडू शकत असे. त्यानं आश्रमात उच्छाद मांडला. तो यज्ञवेदी उद्ध्वस्त करी. पूजासाहित्य, फळे सगळं तो खाऊन फस्त करी. कुठेही उड्या मारी. सगळे आश्रमवासी त्याच्या त्रासाला कंटाळून गेले होते.